# महाविद्यालयांतील पदवी प्रथम वर्षाचा आज पहिला पेपर

## ऑनलाईन परीक्षा : विविध सत्रांमध्ये आयोजन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** कोरोनाचा प्रादुर्भाव वाढत असल्याने शिवाजी विद्यापीठातील विविध अधिविभाग आणि संलग्नित महाविद्यालयांमध्ये पदवी प्रथम वर्षाच्या ऑनलाईन परीक्षेचा प्रारंभ आज, सोमवारपासून होणार आहे. विविध विद्याशाखानिहाय पहिला पेपर होईल. महाविद्यालयांनी दि. १५ मेपर्यंत परीक्षा पूर्ण करण्याचे नियोजन केले आहे. या परीक्षेसाठी विद्यार्थ्यांची मॉक टेस्ट घेण्यात आली आहे.

दोन आठवड्यापूर्वी या अधिविभाग आणि कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील संलग्नित एकूण २७६ महाविद्यालयांना पदवी प्रथम वर्षाच्या परीक्षा ऑनलाईन घेण्याबाबतच्या सूचना केल्या. त्यानुसार अधिविभाग, महाविद्यालयांनी तयारी केली आहे. जादा विद्याशाखांचे अभ्यासक्रम असलेल्या बहुतांश महाविद्यालयांतील परीक्षा सोमवारपासून, तर अन्य महाविद्यालयांमधील परीक्षा बुधवार (दि. ५) पासून सुरू होणार आहेत.

दरम्यान, महाविद्यालयांनी त्यांच्या पदवी प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन परीक्षा घेणे बंधनकारक असल्याचे सांगितले आहे. जे विद्यार्थी परीक्षा देणार नाहीत, त्यांना महाविद्यालयांनी दिलेला निकाल स्वीकारावा लागणार आहे. बहुतांश महाविद्यालयांतील परीक्षा सोमवारपासून सुरू होतील, असे शिवाजी विद्यापीठ प्राचार्य संघटनेचे सचिव डॉ. व्ही. एम. पाटील यांनी रविवारी सांगितले.

### तर, अशा विद्यार्थ्यांची ऑफलाइन परीक्षा

विद्यापीठाने दि. २२ मार्चपासून ऑनलाइन परीक्षा घेण्यास सुरवात केली. विद्यार्थी त्यांना सामोरे जात आहेत. ज्या विद्यार्थ्यांना काही अडचणींमुळे ऑनलाइन परीक्षा देता येऊ शकत नसेल, अशा विद्यार्थ्यांची परीक्षा कोरोना साथीचे वातावरण निवळल्यानंतर ऑफलाइन स्वरूपात घेण्यात येईल, असे कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांनी सांगितले.

**२७६**
संलग्नित महाविद्यालये

**६२८००**
प्रथम वर्ष विद्यार्थी संख्या

### ५० गुणांसाठी २५ प्रश्न

५० गुणांचा २५ एमसीक्यू स्वरूपातील प्रश्नांचा पेपर असणार आहे. हा पेपर सोडविण्यासाठी एक तासाचा वेळ असणार आहे. तांत्रिक अडचण उद्‌भवल्यास ती दूर झाल्यानंतर तितका वेळ विद्यार्थ्यांना पेपर सोडविण्यासाठी वाढवून दिला जाईल.

# कर्मवीर हिरे महाविद्यालयामध्ये ऑनलाईन परीक्षा

**गारगोटी : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या सूचनेनुसार येथील कर्मवीर हिरे महाविद्यालयामध्ये प्रथम वर्ष पदवीच्या प्रथम सत्रातील सर्व परीक्षा बुधवार, दि. ५ मेपासून ऑनलाईन पद्धतीने होणार आहेत. महाविद्यालयाची ऑनलाईन परीक्षेची सर्व तयारी पूर्ण झाली आहे. या परीक्षेसाठी परीक्षा अर्ज भरलेल्या सर्व विद्यार्थ्यांनी त्यांचे मोबाईल क्रमांक व ई-मेल महाविद्यालयाच्या प्रणालीमध्ये नोंद करण्याचे आवाहन परीक्षा विभागातर्फे करण्यात आले आहे. प्रथम वर्ष परीक्षेचे नियोजन व आयोजन महाविद्यालय पातळीवर करावे, अशा सूचना विद्यापीठाकडून सर्व महाविद्यालयांना प्राप्त झाल्या आहेत. कर्मवीर हिरे महाविद्यालयामध्ये बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी., बी.ए.बी.एड. या अभ्यासक्रमांच्या प्रथम सत्राच्या परीक्षा ऑनलाईन पद्धतीने होणार आहेत.

# शासन निर्देशांचे काटेकोर पालन करावे

कोरोना साथीच्या कठीण प्रसंगात शिवाजी विद्यापीठाशी संबंधित सर्वच घटकांनी शासनामार्फत वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या निर्देशांचे काटेकोर पालन करून सहकार्य करावे, असे आवाहन कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांनी शनिवारी केले. त्यांनी सकाळी आठ वाजता सर्व संबंधित घटकांना विद्यापीठाच्या 'शिव वार्ता' या युट्यूब वाहिनीद्वारे संबोधित केले. महाराष्ट्र दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या.